# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१.

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३७२-२२ दिनांक ०५/१२/२०२२

## व्हेल माश्याची उलटी (Ambergris) विक्री व तस्करी करणा-या आरोपींवर गुन्हे शाखा कक्ष-3 च्या धडक कारवाई

मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय परिसरात अवैद्य धंदे तसेच संरक्षीत प्राण्यांचे अवयव यांची बेकायदेशीर विक्री व तस्करी करणा-या इसमांविरुध्द कडक कारवाई करुन पायबंद करणे बाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने पोलीस उप आयुक्त (गुन्हे), सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरारचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गोपनीय बातमीदार याचे मार्फतीने बातमी मिळवली. दिनांक ०४/१२/२०२२ रोजी १९.५० वा चे सुमारास मिळालेल्या बातमीवरुन नालासोपारा पुर्व, रेल्वे स्टेशनजवळ, रेजिन्सी हॉटेलमधील रूम नं १०९ मध्ये इसम नामे १) तरुणकुमार गिरीशभाई तांडेल वय २५ वर्षे, २) श्रावणकुमार भावेश भाई तांडेल, वय २४ वर्षे, ३) उपेनकुमार कांतीलाल तांडेल वय २७ वर्षे, सर्व राहणार जि. नौसारी, राज्य गुजरात, ४) राधेशाम दिनानाथ गुप्ता, वय ३५ वर्षे, रा. नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर हे शासनाने प्रतिबंधित केलेले ७८८ ग्रॅम वजनाचे ७०,००,०००/- रू किंमतीचे व्हेल माश्याची उलटी Ambergris ही बेकायदेशीर रित्या विक्री करण्याच्या उददेशाने जवळ बाळगतांना मिळुन आले.

सदर आरोपीत विरुध्द तुळींज पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर ७६६/२०२२ वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ कलम २(३२)(३६), ९, ३९(बी), ४०, ४४, ४८(अ), ४९(ब), ५१, ५७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर आरोपीतांना अटक करण्यात आली आहे व पुढील तपास तुळींज पोलीस ठाण्याच्यावतीने करण्यात येत आहे.

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पो.उपनिरी/ उमेश भागवत, पो.हवा/ अशोक पाटील, पो.हवा/ मुकेश तटकरे, पो.हवा/ सागर बारवकर, पो.हवा/ सचिन घेरे, पो.हवा/ शंकर शिंदे, पो.हवा/ मनोज सकपाळ, पो.हवा/ अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, पो.अं./ सुमित जाधव, मसुब/ प्रविन वानखेडे सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष -३ तसेच वनरक्षक श्री. पंकज यादव यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

